अॅग्रोवन

# मिरचीवरील फुलकिडे, पांढरी माशी, मावा, लीफ कर्लवर उपाययोजना





डॉ. संजय कोळसे डॉ. अनिकेत चंदनशिवे डॉ. सखाराम आघाव

## कीड

### फुलकिडे



फुलकिडीचा प्रादुर्भाव.

- पानांच्या खालच्या व वरच्या बाजूस राहून पानांतील रस शोषून घेतात.
- शेंडा किंवा पानाच्या खालील बाजूस प्रादुर्भाव दिसतो. पाने लहान होतात. यालाच 'बोकड्या किंवा चुरडा मुरडा' असे म्हणतात.

**नियंत्रण** : (प्रमाण : प्रति लिटर)

- इमिडाक्लोप्रीड (१७.८ टक्के एसएल) ०.२५ मिलि किंवा
  थायाक्लोप्रीड (२१.७० टक्के एस.सी.) ०.४५ मिलि किंवा
  अॅसिटामाप्राइड (२० टक्के एस.पी.) ०.१६ ग्रॅम किंवा
  लॅम्बडा सायहॅलोथ्रीन (५ टक्के ई.सी.) ०.७५ मिलि प्रति लिटर पाण्यात स्टिकरसह मिसळून आलटून-पालटून फवारण्या कराव्यात.

### पांढरी माशी



- पानातील रस शोषण करते. यामुळे पाने पिवळी पडून करपतात.

**नियंत्रण**

- एकरी १२ पिवळे चिकट सापळे लावावेत.

**रासायनिक फवारणी** : (प्रतिलिटर पाणी)

- फेनप्रोपॅथ्रिन (३० टक्के ई.सी.) ०.३४ मिलि किंवा
  पायरिप्रॉक्सिफेन (५ टक्के) अधिक फेनप्रोपॅथ्रिन (१५ टक्के ई.सी.) (संयुक्त कीटकनाशक) १ मिलि किंवा
  हॅक्सिथायझॉक्स (३.५ टक्के) अधिक डायफेन्थुरॉन (४२ टक्के डब्ल्यू.डी.जी.) (संयुक्त कीटकनाशक) १.३ ग्रॅम किंवा
  पायरीप्रॉक्सिफेन (१० टक्के ईसी) १.६६ मिलि

### मावा

- कोवळी पाने आणि शेंड्यातील रस शोषतात. त्यामुळे नवीन पालवी येणे थांबते.

**रासायनिक नियंत्रण** (प्रमाण : प्रतिलिटर पाणी)

- फिप्रोनील (०.५ टक्का एस.सी.) १.६ मिलि किंवा
  फिप्रोनील (१८.८७ डब्ल्यू. डब्ल्यू.) ०.५ मिलि किंवा
  इमिडाक्लोप्रिड (३०.५० टक्के एन. एम. एस.सी.) ०.२५ मिलि किंवा
  पायरीप्रॉक्सिफेन (१० टक्के ई.सी.) १.६६ मिलि किंवा
  डायफेन्थुरॉन (४७ टक्के) अधिक बायफेन्थ्रीन (९.४० टक्के) (संयुक्त कीटकनाशक) १.२५ मिलि

## रोग

### लीफ कर्ल (चुरडा मुरडा)



- या विषाणूजन्य रोगाचा प्रसार फुलकिडे, तुडतुडे व मावा या रसशोषक किडींमार्फत होतो.
- किडीने पानांतील रसशोषण केल्यामुळे पानांच्या शिरांमधील भागावर सुरकुत्या पडतात.
- संपूर्ण पानांची वाढ खुंटते. झाड रोगट दिसते. फुलधारणा बंद होते.

**नियंत्रणासाठी उपाय**

- रोगग्रस्त झाडे मुळासकट उपटून जाळून नष्ट करावीत.
- फुलकिडे, तुडतुडे व मावा किडींच्या नियंत्रणासाठी कीड नियंत्रणात दिल्याप्रमाणे गरजेनुसार फवारणी करावी.
- मिरची पिकाच्या बाजूने मका पिकाची दोन ते तीन ओळींमध्ये लागवड करावी.

- डॉ. संजय कोळसे,
(वनस्पती रोग शास्त्रज्ञ) ९८९०१६३०२१,
- डॉ. सखाराम आघाव,
(कीटकशास्त्रज्ञ) ९४२३००३३०७,
(महात्मा फुले कृषी विद्यापीठ,
राहुरी, जि. नगर)

Agrowon